# ।। ॐ श्री साईराम ।।

# 'साई पर्ल्स ऑफ व्हिजडम'

# साई ज्ञानमौक्तिके

भगवान साईबाबांच्या चरणकमलांना वंदन

भाग १५ ड

## ''हे सर्व काल्पनिकच आहे का?''

''स्वामी! सीतेच्या विरहामुळे श्रीरामचंद्राने शोक केला हा सुद्धा आभासच होता का? तुम्हाला रामायणाची कथा माहीत आहे. तीसुद्धा काल्पनिकच होती का? हे मला समजून घ्यायचं आहे?''

बाबा म्हणाले, ''होय, तीसुद्धा काल्पनिकच होती.''

''मग त्यांनी शोक का केला?''

''नाही,नाही! त्याने शोक केला पण रुदन केल्याचे भासवले. तो खरोखरचा रडला नाही.''

मी याच्यावर काय बोलणार? मी काही आता रामाला भेटू शकत नाही आणि खरी गोष्ट काय हे मी तपासू शकत नाही. (हशा) स्वामी स्वतःच राम असल्याने आणि तेच हे सांगत आहेत, तर मी प्रश्न विचारणारा कोण?''

''स्वामी, कृपा करा, हरी ओम् तत्सत्! मला हे लक्षात येत नाही. कृपा करून सांगा.''

बाबा म्हणाले, ''सीतेला रावणाने पळवून नेल्यावर....'' मी हे कसं स्पष्ट करू? रावणाने दुसऱ्याच स्त्रीला पळवून आणले. ती स्त्री सीतेसारखीच दिसत होती. पण मी मायावी, फसवी सीता होती. खरी सीता अग्निमध्ये होती आणि ज्या स्त्रीला रावणाने आणली होती, ती मायावी सीता होती. ती आभासी सीता होती, असे होते. रामायणाच्या शेवटी रामाने अग्निमधून सीतेला बाहेर काढले. म्हणजे, तथाकथित शोक करणं हेही खोटेच होते. अगदी रामाचे अश्रूदेखील खोटेच होते.'' असं भगवान म्हणाले.

''तर मग स्वामी, महाभारत हेसुद्धा काल्पनिकच आहे का?''

रामायणही काल्पनिक आहे, अच्छा! (हशा) महाभारतही काल्पनिकच का?''

बाबा म्हणाले, ''तेसुद्धा काल्पनिकच आहे.'' तो दिवसच आभासाचा होता, एवढेच. (हशा) त्यात प्रश्नच नाही. पूर्ण विराम!

बाबांनी एक प्रसंग सांगितला. त्या काळात वधूने वर निवडणे ही एक प्रथा होती. खूप लोक येत असत आणि ती त्यातून एकाला पसंत करीत असे. समजतंय ना! त्याला 'स्वयंवर' किंवा 'स्वतःची निवड' असे म्हणत असत. तेव्हा वधूकडून वर पसंत केला जाई. भारतामध्ये वधूकरता वर पालकाकडून निवडला जात असे. त्याला 'ठरवलेले लग्न' असे म्हटले जाते. त्या काळी असे नव्हते. त्या काळात वधू आपला पती निवडायला स्वतंत्र असे. ती ते कसे करत असे? त्याचा फोटो वगैरे पाहून नाही. त्यावेळी एक परीक्षा द्यावी लागत असे. रामायणामध्ये, पुरुषांसाठी शिवधनुष्य उचलण्याची परीक्षा होती. महाभारतात, एका तळ्यात मासा ठेवला जात असे. सगळे राजपुत्र त्या माशाच्या प्रतिबिंबाकडडे पाहत असत. ते प्रतिबिंब पाहत असताना, नेम धरून त्यांना तो मासा मारायचा असे. अशीच काहीतरी गोष्ट आहे. (द्रौपदीने तिच्या लग्नाकरता एक खास अट ठेवली होती. ती अट म्हणजे जो राजपुत्र त्या फिरत्या माशाचा डोळा फोडेल, तेही प्रतिबिंबात पाहून, त्याच्याशी ती लग्न करेल.) तेव्हा जो राजपुत्र ही अट पुरी करून यशस्वी होईल, तोच तिच्याशी लग्न करण्यास योग्य ठरेल. गरीब बिचारा! वधू तिच्या हातात फुलांचा हार घेऊन, कोणता राजपुत्र यशस्वी होतो हे बघत राहील. (हशा) लगेचच ती असा राजपुत्र बघेल, ती जाऊन त्याच्या गळ्यात तो फुलांचा हार घालेल.

आता बाबा म्हणाले, ''अर्जुन, एका गरीब ब्राह्मणाच्या वेषात आला होता. (जेव्हा ती परीक्षा देऊन द्रौपदीशी विवाह करण्याचे त्याने ठरवले) तो राजपुत्र म्हणून आला नव्हता, नाही. तो एका गरीब ब्राह्मणाच्या वेषात आला होता. द्रौपदीला माहीत नव्हता की तो एका राजाचा मुलगा आहे.

म्हणून त्यावेळी कृष्णाने जे काही केलं तो भास नव्हता. तो फक्त मार्गदर्शक होता. बघणाऱ्याच्या दृष्टीकोनातून त्याचे वागणे आभासात्मक वाटते. कृष्णाने ते काही केलं तो फक्त धर्म होता, त्या काळात ते धर्माविरुद्ध नव्हते. आपल्याला मात्र चुकीचा अर्थ घेण्याचा संभ्रम निर्माण होतो.

''कृष्ण पांडवांच्या बाबतीत पक्षपाती होता का?''

मग मला वाटलं की आता यापुढे वाद घालण्यात अर्थ नाही. मी म्हणालो, ''यापेक्षा जास्त काही आपल्याकडून अपेक्षित नाही. कृष्णाशिवाय दुसऱ्या कुणाला तुम्ही सहाय्य कराल? तुम्ही कृष्ण असल्यामुळे, तुम्ही कृष्णालाच मदत कराल! मला हे समजतंय! तेव्हा तुम्ही सत्य आहात आणि आम्ही आभासमय आहोत.'' मी असंही म्हटलं, ''स्वामी, कृष्ण हा पांडवांच्या पक्षपाती होता.'' तुम्ही जर महाभारत वाचलंत तर तुमच्या लक्षात येईल की कृष्ण खूपच पक्षपाती होता. पांडवांनी युद्ध जिंकावं म्हणून त्याने नाना प्रकारचं राजकारण केलं. (हशा) तरुण पिढी हा दृष्टिकोन मान्य करणार नाही, पण आमचे पालक आणि आजी-आजोबा ते मान्य करतील. मुले तर सरळ म्हणतील, ''कृपया हे थांबवा. कृष्ण असं का करेल? देव पक्षपाती नसतो; कमीत कमी त्यानं तसं नसावं.'' म्हणून मी विचारलं, ''स्वामी, कृष्ण हा पांडवांच्या बाबतीत पक्षपाती होता, हे देवाच्या बाबतीत योग्य आहे का? कृपया उत्तर द्यावे.''

स्वामी म्हणाले, ''हॅं! तुम्ही सगळे मूर्खच दिसता!''

''अर्थात मला माहीत आहे की मी त्यातला एक दिसत नसावा. (हशा) हे सगळं कशाला?''

बाबा म्हणाले, ''तो पक्षपाती दिसत असेल. पण वास्तविक म्हणजे सत्य हे आहे की कृष्ण हा कधीच पक्षपाती नव्हता.'' ते पुढे म्हणाले, ''युद्ध सुरू होण्यापूर्वी धर्मराज, पांडवांतील सर्वात ज्येष्ठ भाऊ पुढे आला आणि त्याने भीष्मांचा चरणस्पर्श केला. तो म्हणाला, ''हे पितामह, इतकी वर्षे तुम्ही आमची काळजी घेतलीत, तुम्ही आम्हाला वाढवलंत. आम्ही तुमचे खूप आभारी आहोत. पितामह, या युद्धाबद्दल क्षमा करावी. मला या युद्धात लढावं लागत आहे. मी तुमच्या चरणांना स्पर्श करून अनुग्रह मागतो आहे.'' भीष्म त्यावेळेस काय म्हणाले हे तुम्हाला माहीत आहे? धर्मराज, जिथे कुठे धर्म असेल, तिथे तिथे विजय होणारच असतो. मी तुला आशीर्वाद देतो.'' नंतर धर्मराज, गुरू द्रोणांकडे गेले. त्यांच्या चरणांना त्याने स्पर्श केला व म्हणाला, ''हे गुरुदेव, तुम्ही आम्हाला सर्व निषाणबाजी, धनुर्विद्या शिकवलीत. ती आता तुमच्याशी युद्ध करणार आहे. मला आपले आशीर्वाद आणि अनुज्ञा असावी. द्रोणांनी उत्तर दिले, ''माझ्या पुत्रा, असं बघ, जिथे जिथे धर्म असतो तिथे तिथे कृष्ण आहे आणि जिथे कृष्ण आहे, तिथे विजय आहे. घाबरू नको, चिंता करू नकोस, तू यशस्वी होशील. माझे आशीर्वाद घेऊन जा.''

''तुम्ही असं म्हणता की कृष्ण पक्षपाती होता? द्रोणानी त्यांना आशीर्वाद दिला, भीष्मांनी त्यांना आशीर्वाद दिला. त्यांनी नेहमीच धर्माचा मार्ग अनुसरला म्हणून शेवटी युद्धात ते विजयी झाले.''

भगवान पुढे म्हणाले, ''युद्धामध्ये सर्व कौरव मरण पावले. कृष्ण, कौरवांची माता गांधारी हिच्याकडे सांत्वन करण्यासाठी गेला. कौरवांची आई गांधारीने कृष्णाला दोष देण्यास सुरूवात केली. ''अरे, देवा! आता तुझं समाधान झालं का? तू पांडवांच्या बाजूने अतिशय पक्षपातीपणा केलास. माझ्या मुलांच्या मृत्यूला तू जबाबदार आहेस. आहेस ना आनंदात? तू कसल्या प्रकारचा देव आहेस?'' तिचं असं बोलणं चालूच होतं. ती काही झालं तरी त्यांची आईच होती. मग कृष्णाने उत्तर दिलं, ''हे गांधारी, तू का रडत आहेस? खरं म्हणजे, तुझा पती धृतराष्ट्र जन्मांध असल्यामुळे राज्याचा राजा होण्यास योग्यच नव्हता. तुला माहीत आहे की अंध

माणूस कधी राजा होऊ शकत नाही. जरी त्याला राजा म्हणून राज्य करण्याचा अधिकार नव्हता, तरी त्याने दीर्घकाळ राजा म्हणून कार्य केलं. नंतर तू त्याच्या पावलांवर पावलं उचललीस कारण तुझा पती जन्मांध असल्याने तू तुझ्या डोळ्यावर वस्त्राची पट्टी बांधलीस, परिणामी तू तुझ्या मुलांकडे पाहू शकली नाहीस आणि त्या मुलांना मातेचे आर्शीवादही घेता आले नाहीत, मग बाहेरच्या लोकांनी त्यांना आशीर्वाद द्यावेत अशी अपेक्षा तू कशी करतेस? ज्या मुलांना मातेचे आशीर्वाद मिळू शकले नाहीत, त्यांना देवाकडून आशीर्वाद मिळावेत अशी अपेक्षा तू कशी करतेस? तुझी चूक झाली आहे.''

जेव्हा भगवानांनी महाभारतातील ही कथा थोडक्यात सांगितली तेव्हा प्रत्येकाचं मन हेलावलं. बाबांनी दुसरं एक उदाहरण दिलं. ती एक छोटीशी कथा आहे. असं झालं की एका अंध माणसाला मूल झालं. ह्या अंध माणसांच्या बायकोला कामावर जावं लागे. कामावर जाण्याआधी ती तिच्या अंध पतीला सांगत असे, ''हे पहा, मी कामावर जात आहे. जर बाळ रडले तर मुलाला दूध पाजा.'' आंधळा माणूस म्हणाला, ''दूध कसं असतं?'' बायको म्हणाली, ''तुम्हाला माहीत नाही? दूध पांढरं असतं.'' ''ओह्! लक्षात आलं. पांढरं म्हणजे काय, कसं असतं?'' बायको म्हणाली, ''बगळ्यासारखं.'' ''बगळा कसा असतो?'' ती स्त्री असं दाखवू लागली. (अनीलकुमारांनी आपले हात हलवून दाखवले) हशा. तो माणूस आंधळा होता. आपले हात बगळ्याप्रमाणे हलवून दाखवू लागली. तेव्हा हे असं होतं. आंधळा राजा धृतराष्ट्राला सत्य काय आहे ते माहीत होतं, पण तो सत्याच्या मार्गाने गेला नाही. असं असतं की एखादा माणूस पाण्यात बुडत असेल तर तो बोलू शकत नाही. धृतराष्ट्र हा मुलांवरील प्रेमाच्या पाण्यात बुडाला होता म्हणून तो बोलू शकत नव्हता.

## ''सत्याचे आचरण कसे करायचे?''

मग मी म्हणालो, ''स्वामी, सत्याबद्दल तुम्ही किती छान बोलत आहात? तुमच्याप्रमाणे सत्य कोणीच बोलू शकत नाही, कारण तुम्ही 'सत्यसाई' आहात. सत्य म्हणजे खरं. स्वामी, आम्ही सत्य कसे आचरावे? हे मला समजले पाहिजे. सत्य हे महान असतं हे तुम्ही सुंदर रीतीने स्पष्ट केलंत. पण आम्ही सत्य कसं आचरणात आणावं?''

बाबा म्हणाले, ''अगदी साधे, सोपे आहे.''

''ओह्! असं कसं स्वामी?''

''जसं २+२=४ तसंच सत्य हे साधं आणि निश्चित असतं. त्यात मतभेद नाही; संदिग्धपणा नाही. तुम्ही ते सहज आचरू शकता.''

## ''काढणे आणि तुमच्याकडे ओढून घेणे.''

मधल्या वेळात बाबांनी आपली दृष्टी भक्तांवर स्थिर केली. मग त्यांनी पाठीमागे आमच्याकडे पाहिलं आणि म्हणाले, ''पहा, इथे रशियातून आलेले ७१ भक्त आहेत. इथूनच त्याच्याकडे नीट पाहा. ते येथे पूर्ण एकाग्रतेने बसलेले आहेत. फक्त स्वामींचाच विचार करत आहेत. तुम्ही त्यांच्याकडे लक्षपूर्वक बघा! मुलांनो, तुम्हाला माहीत नाही. आज रशियामध्ये मोठ्या संख्येनं भक्तगण आहेत. बहुतेकांकडे त्याच्या घरामध्ये, ऑफिसमध्ये बाबांचे फोटो आहेत.''

मी म्हणालो, ''स्वामी, तुम्ही शिर्डी साईंप्रमाणे पोपटाच्या पायाला दोरा बांधून, त्यांना तुमच्याकडे ओढून आणता. जगभरातील तुमच्या सर्व भक्तांना तुमच्या चरणकमलांपाशी ओढून आणलं आहे.''

स्वामींची त्या दिवशीची शिकवण तत्त्वज्ञानाने भरलेली होती. ती खूप सखोल आणि गंभीर होती.

## ''मेक्सिकोची तीन मुले''

मग स्वामी आपल्या खुर्चीतून फिरु लागले. तुम्हाला माहीत असेलच की साधारणपणे स्वामी नेहमी

फिरत्या खुर्चीत बसतात. त्यांनी अचानकपणे तीन परदेशी मुलांना जवळ येण्यास सांगितलं. ते उड्या मारत आले. त्यांनी बाबांकडे अशा तऱ्हेने येणे हे बघावयास छान वाटले. स्वामींवरील भक्तीमुळे ते खूप दुरून आले होते. जेव्हा स्वामी एखाद्या परदेशी माणसाला आपल्याकडे बोलावतात तेव्हा मला त्यांचा फोटो काढावासा वाटतो कारण प्रत्येक माणूस समाधानाने भारलेला असतो, एखाद्या हजारो मेणबत्त्यांच्या शक्तीच्या बल्बसारखा! (हशा) ही मुलं अशा उड्या मारत होती की खरोखरी ते सोपं नव्हतं. ते पाहताना खूप छान वाटत होतं. जेव्हा स्वामी त्यांना मुलाखतीसाठी बोलावत, तेव्हा सर्वसाधारणपणे मी तेथे बसलेला पाहिलं असेलच. ही मुलं आत जाताना फार आनंदात असत. (हशा) इतके आनंदी, आह्! तर स्वामींनी त्या मुलांना बोलावले. ते शेळ्यांसारखे उड्या मारत होते. स्वामींनी त्यांना विचारलं, ''तुम्ही कोठून आलात?'' अर्थात् ते त्यांना माहीतच होतं. ती मुलं म्हणाली, ''मेक्सिको, स्वामी.'' ''हे! मेक्सिको का? तू मेक्सिकोमध्ये काय करतोस?'' स्वामींनी खास करून एका मुलाला विचारलं. ''तू काय करतोस, बाळा?'' ''आह्, विद्युत अभियंता.'' मग दुसऱ्या मुलाला विचारले, ''तू काय करतोस?'' ''व्यवसाय करतो स्वामी.'' ''ओह्, व्यवसाय? आणि तू रे बाबा?'' ''मी मेक्सिको विद्यापीठात प्रोफेसर आहे. ''ओह्, असं काय? तुला काय पाहिजे? ये इकडे, मला सांग. मी ते तुला देईन.''

तुम्हाला समजलंच असेल, जरी मी त्यांना 'मुलं' असं म्हटलं असलं तरी ते खरे मोठे झालेले होते. काही म्हटलं तरी कोणालाही 'प्रौढ सद्‌गृहस्थ' असं म्हटलेले आवडत नाही. आपण सगळी मुलंच आहोत, विशेषत: स्वामींसमोर! ती मुलं म्हणाली, ''स्वामी, आम्हाला तुम्ही हवे आहात! तुम्ही हवे आहात!'' ते सर्वजण एकसुरात म्हणाले.

तेव्हा स्वामी म्हणाले, ''तुम्ही मेक्सिकोला परत केव्हा जाणार आहात?''

''अंऽऽ! एप्रिल २५ ला, स्वामी.''

''तुम्ही येथे का आला आहात?'' मेक्सिकोतील एक जण म्हणाला, ''स्वामी, आम्हाला आमची सुट्टी स्वामींबरोबर घालवायची होती, म्हणून आम्ही येथे आलो आहोत.''

तेव्हा स्वामी म्हणाले, ''ठीक आहे, तुम्ही जाऊन बसून घ्या.''

ते तिथून निघण्यापूर्वी स्वामी म्हणाले, ''मी तुम्हाला उद्या परत बोलावेन. तयार रहा. तुम्ही तयार रहा.''

जेव्हा स्वामींनी त्यांना सांगितलं की मी तुम्हाला परत बोलावेन, तेव्हा ती मुलं खरोखरीच चालत नव्हती, तर ती तरंगायला लागली होती. (हशा) त्यांना त्या परिस्थितीत पाहणं म्हणजे एक प्रकारचं शिक्षणच होतं. होय. मीसुद्धा खूप आनंदात होतो. मग स्वामींनी आमच्याकडे बघितलं आणि म्हणाले, ''त्या परदेशी लोकांकडे पहा. ते किती आनंदात आहेत. त्यांच्या चेहऱ्याकडे पहा. नेहमी हसतमुख, बघितलंत! हे परदेशी लोक-भक्त- त्यांचा वेळ जास्तीत जास्त सत्कारणी लावतात. तुम्हाला ह्या गोष्टी माहीत असल्या पाहिजेत.

### ''व्यक्तिगत, सामाजिक आणि आध्यात्मिक मूल्ये''

मधल्या वेळात स्वामींनी बाजूला पाहिले आणि एका विद्यार्थ्याला बोलावलं. ''इकडे ये रे बाळा, तू काय शिकत आहेस? कसला अभ्यास करत आहेस?''

''स्वामी, पीएच.डी.''

''हंऽऽ डॉक्टरेट?''

''होय स्वामी.''

''असं का? तुझा विषय कोणता आहे?''

''मूल्याधारित समाज, स्वामी.''

''आहे हो! मूल्याधारित?''

मी लगेच संधी घेतली. ''स्वामी, एक शंका. खरं म्हणजे ते त्या विद्यार्थ्याशी बोलत होते. पण मी मधेच त्यांना थांबवलं कारण तो मुलगा ते विचारू शकला नसता. स्वामी, निघून गेले असते आणि आम्हाला त्या काही गोष्टी कळण्याची संधी मिळाली नसती. जर ते त्यांना आवडलं नसतं, तर ते फार तर म्हणाले असते, ''हे! शांत राहा. वेळ संपली आहे. खाली बस.''

एवढंच! त्यामुळ काही बिघडलं नसतं. जर आम्हाला काही आणखी माहिती मिळाली असती, तर ते आम्हाला चाललं असतं.

''स्वामी, आम्हाला एक शंका आहे.''

''हं! काय शंका आहे?''

''व्यक्तिगत मूल्ये काय असतात? सामाजिक मूल्ये काय असतात आणि आध्यात्मिक मूल्ये कोणती? ती फायद्याची आहेत की तोट्याची असतात? मला हे समजावं.''

बाबा म्हणाले, ''जी मूल्ये बदलत नाहीत, युगानुयुगे अबाधित असतात, जी मूल्ये भूत, वर्तमान आणि भविष्यात टिकून राहतात, ती पायाभूत मूल्ये असतात. ती आध्यात्मिक मूल्ये असतात. जी मूल्ये वेळेनुसार बदलतात, जी समाजाच्या चालीरीती, रुढींवर अवलंबून असतात, ती सामाजिक मूल्ये होत. प्रत्येक व्यक्तीच्या वागणुकीप्रमाणे, वैयक्तिक दर्जा सुधारण्यासाठी आणि समाजकल्याणासाठी केल्या जाणाऱ्या कार्यांना वैयक्तिक मूल्ये असं म्हणावं.''

''स्वामी, हे खूपच उत्सुकता, उत्कंठा वाढवणारं आहे.''

''तुला माहीत आहे,'' भगवान म्हणाले, ''आकाशात ढग येतात आणि नाहीसे होतात, पण आकाश कायम तसंच राहतं. एक भांडं आणि त्याचं झाकण ही दोन दिसतात पण ती दोन्हीही एकाच मातीची असतात. त्याचप्रमाणे आध्यात्मिक मूल्ये, सातत्याच्या प्रवाहात स्थिर होतात, ती मूल्ये कायम राहतात आणि समाजातील अनेकत्वातील एकत्व टिकवतात. आध्यात्मिकता आणि आध्यात्मिक मूल्ये कधीही विभाजनाकडे जाणार नाही; ती अनेकत्वाकडे जाणार नाहीत. आध्यात्मिक मूल्यांचा हेतू आणि विषय एकता हाच आहे.''

इतक्यात संगीत सुरू झाले आणि भगवान खुर्चीतून उठले आणि एका हाताने भगवी कफनी धरून, त्यांनी सगळ्यांकडे पाहून मंदस्मित करून ते भजन हॉलकडे, हळूहळू आणि रुबाबात चालू लागले.

साई राम, साई राम, साई राम!

ॐ लोका: समस्ता सुखिनौ भवन्तु।

लोका समस्ता सुखिनौ भवन्तु।

लोका समस्ता सुखिनौ भवन्तु।

ॐ शांति, शांति, शांति!!

***